# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड    जा. क्रं. 93/2024    दिनांक : 11.03.2024**

## 1)जबरी चोरी :–

**1)मनाठा** :–दिनांक 10.03.2024 रोजी चे 15.00 वा. सुमारास, **मौ. कवाना ता. हदगांव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा साक्षीदारासह कंपणीचे प्लॉटवर काम करत असतांना यातील आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस दारू पिण्यासाठी पैशाची मागणी करून त्याचे जवळील चाकु फिर्यादीच्या गळयास लावुन चाकुचा धाक दाखवुन फिर्यादी जवळील नगदी 1100/–रू जबरीने चोरून घेतले व थापडा बुक्याने मारहाण केली. वगैरे **फिर्यादी तजरूल पि. ताहेर, वय 42 वर्षे, रा. धफहहा ता. पलासी जि. आररीया राज्य बिहार** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मनाठा** गुरनं 35/2024 कलम 397, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कांबळे, मो.नं. 9970073425** हे करीत आहेत.

**2)भाग्यनगर** :–दिनांक 09.03.2024 रोजी चे 21.15 वा. सुमारास, **जंगमवाडी येथील देशी दारूचे दुकानावर नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून दारूच्या दुकानात प्रवेश करून फिर्यादी सोबत झटापट करून मुक्का मार मारून कांऊटरमधील 21,500/–रूपये जबरीने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी मारोती देशरथ मोरे, वय 42 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. वसरणी ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 95/2024 कलम 394, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री देशमुख, मो.नं. 9921533111** हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :–

**1)किनवट** :– दिनांक 09.03.2024 रोजी चे 08.00 ते 10.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहाते घरी रेल्वेस्टेशने रोड किनवट ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे सहकुटूंब वॉचमनला घरी ठेवुन बाहेर हैदराबाद येथे गेले असता व सदरील वॉचमन हा जवेण करण्यासाठी त्याच्या घरी गेला असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने शिरून घरातील कपाटातील नगदी तीन लाख रूपये व सोन्याचे दागीने किंमती 3,60,000/–रू चे एक पिस्टल व आठ जिवंत काडतुस किंमती 50,000/–रू असा एकुण 7,10,000/–रू चा ऐवज चोरून नेला. वगैरे **फिर्यादी साजिदखान निसारखान, वय 47 वर्षे, व्यवसाय व्यापार व माजी नगरसेवक रा. रेल्वे स्टेशन रोड किनवट ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 57/2024 कलम 454, ,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री येवले, मो. नं. 7798597775** हे करीत आहेत.

**2)विमानतळ** :– दिनांक 09.03.2024 रोजी चे रात्री 02.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरून गोपाळनगर** सांगवी ता. जि. **नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे घराचे मेन दरवाजाचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने कडी कोंडा तोडुन व घराचे कुलूप तोडुन घरात प्रवेश करून सोन्या चांदीचे दागनी किंमती 49,000/–रू चा ऐवज चोरून नेला. वगैरे **फिर्यादी संतोष पि. तुकाराम अन्नमवार, वय 45 वर्षे, व्यवसाय शिक्षक रा. गोपाळनगर सांगवी नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 69/2024 कलम 457, ,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2403 पठाण, मो. नं. 7020307862** हे करीत आहेत.

## 3)जनावर चोरी :–

**नांदेड ग्रामीण** :– दिनांक 09.03.2024 रोजी चे सायंकाळी 06.00 वा. ते दिनांक 10.03.2024 रोजी चे 06.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे शेतातील आखाडयावरून मौ. किकी शिवार ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे शेतातील आखाडयावर बांधलेले दोन बैल किंमती 50,000/–रूपयाचे नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी तुकाराम गोविंदराव किरकण, वय 47 वर्षे, व्यवसाय शेती रा. किकी ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 180/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/581 मांजरमकर, मो.क्रं. 9823665909** हे करीत आहेत.

## 4)गंभीर दुखापत :–

**अर्धापुर** :–दिनांक 08.03.2024 रोजी चे 00.25 वा. चे सुमारास, **इदगा मैदान जवळ अर्धापुर ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आठ आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन यातील फिर्यादी हा घराकडे जात असतांना ईदगा मैदान जवळ आला असता मागील आठ दिवसापुर्वी पंजा मिळवण्याच्या शर्यतीचे कारणावरून शर्यत जिंकल्याच्या राग मनात धरून डोक्यावर, तोंडावर, फायटरने मारून तोंड फोडले. हातातील लाकडाने मारहाण केली रोडवर खाली पाडले व शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी शेख सोहेल उद्दीन पि. शेख मुस्तापुदीन शेख, वय 20 वर्षे, व्यवसाय मिस्त्रीकाम रा. इंदिरानगर अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 97/2024 कलम 141, 143,147,148,149,325,504,506 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री बुध्देवार, मो. नं. 9970732468** हे करीत आहेत.

## 5)भारतीय हत्यार कायदा :–

**1)भाग्यनगर :–**दिनांक 10.03.2024 रोजी चे 16.00 वा. सुमारास, **मोर चौक नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने विना परवाना बेकायदेशिररीत्या लोखंडी खंजर ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री विनोद पि. भाऊसाहेब, ने. पोस्टे भाग्यनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 97/2024 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/985 चन्ने, मो.क्रं. 9403883414** हे करीत आहेत.

**2)इतवारा :–**दिनांक 09.03.2024 रोजी चे 03.00 वा. सुमारास, **भगतसिंघरोड अबचलनगर समोरील सार्वजनिक रोडवर इतवारा नांदेड येथे,** यातील नमुद तेरा आरोपीतांनी गैरकादयाची मंडळी जमवुन विनापरवाना बेकायदेशिररीत्या खंजरने केक कापुन रत्यावर फटाके फोडुन हातात खंजीर घेवुन आरडा ओरड करून दहशत पसरवली. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/436 एकनाथ सखाराम मोकले, ने. पोस्टे इतवारा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 61/2024 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/आर बी चौधरी, मो.क्रं. 7249229729** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड